**आकाशवाणी मुंबई**
**प्रादेशिक बातम्या देत आहे.**

संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी बलिदान देणाऱ्या १०७ हुतात्म्यांना आज आदरांजली वाहण्यात येत आहे. मुंबईत हुतात्मा चौक इथल्या हुतात्मा स्मारकाला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पुष्पचक्र अर्पण करून अभिवादन केलं. 'या १०७ हुतात्म्यांच्या बलिदानामुळेच मुंबई महाराष्ट्राला मिळाली असून त्यांचं बलिदान कधीही विसरता येणार नाही', अशा शब्दात त्यांनी श्रद्धांजली वाहिली. शहिदांना केवळ अभिवादन करून उपयोग नाही तर आपलं राज्य प्रत्येक क्षेत्रात आघाडीवर नेऊन त्यांचा नावलौकिक सदैव अबाधित ठेवणं, हीच या हुतात्म्यांना खरी आदरांजली ठरेल, असं ते म्हणाले. कार्यक्रमाला विधानपरिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, उपमुख्यमंत्री अजित पवार, मुंबई शहर जिल्ह्याचे पालकमंत्री दीपक केसरकर आदी मान्यवर उपस्थित होते.

**<><><><><><>**

शिवसेना आमदार अपात्रता प्रकरणावर आज विधानभवनात सुनावणी सुरू झाली असून विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्याकडे शिंदे गटानं कागदपत्रं सादर करण्यासाठी वेळ वाढवून मागितला. त्यानुसार, आता शिंदे गट येत्या २४ नोव्हेंबर पर्यंत विधानसभा अध्यक्षांकडे कागदपत्रं सादर करणारं आहे. यावेळी ठाकरे गटाकडून देखील कागदपत्रं सादर करण्यात आले. सुनावणीदरम्यान, शिंदे गटाकडून वकील महेश जेठमलानी आणि ठाकरे गटाकडून वकील देवदत्त कामत यांनी एकमेकांवर वैयक्तिक टीकाटिप्पणी केली, मात्र या प्रकरणामुळं विधानसभा

अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी दोन्ही गटांच्या वकिलांवर नाराजी व्यक्त करत, वैयक्तिक टीका नको, मुद्दा कायदेशीर रित्या मांडला पाहीजे असं सांगितलं.

**<><><><><>**

विकसित भारत संकल्प यात्रेअंतर्गत आज राज्यातल्या ५ जिल्ह्यात ३६ ठिकाणी आरोग्य शिबिरांचं आयोजन केलं आहे. या आरोग्य शिबिरांना नागरिकांचा मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळतो आहे. नाशिक, नंदूरबार, पालघर, नांदेड आणि गडचिरोली जिल्ह्यात सध्या ही यात्रा सुरू आहे. ठिकठिकाणी नागरिक मोठ्या उत्साहात या यात्रेचं स्वागत करत आहेत. नंदूरबार जिल्ह्यातल्या शहादा तालुक्यात डोंगरगावमध्ये हा रथ  पोहोचला. याविषयी स्थानिक रहिवासी रजनीश पाटील यांनी आकाशवाणीकडे प्रतिक्रिया व्यक्त केली.

- **होल्ड - नंदूरबार रजनीश पाटील बाइट**

**<><><><><>**

मुंबईतलं हवा प्रदूषण आटोक्यात आणण्यासाठीच्या विविध उपाययोजनांचा आढावा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज घेतला. आज सकाळी त्यांनी वांद्रे आणि खारच्या जॉगर्स पार्कला भेट देऊन नागरिकांशी संवाद साधला.

**BYTE**

यावेळी मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त इकबालसिंह चहल, अतिरिक्त आयुक्त सुधाकर शिंदे तसंच मुंबई महानगरपालिकेचे सर्व अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते, अशी माहिती शासनाच्या प्रसिद्धी पत्रकात दिली आहे.

**<><><><><>**

गोव्यात पणजी इथं सुरू असलेल्या ५४ व्या आंतरराष्ट्रीय भारतीय चित्रपट महोत्सव- इफ्फी मध्ये आज इंडियन पॅनोरमाचं उद्घाटन माहिती आणि प्रसारण मंत्री अनुरागसिंह ठाकूर यांच्या हस्ते इंडियन पॅनोरमाचं झालं. दरम्यान, या चित्रपट महोत्सवाच्या फिल्म बाजार विभागासाठी महाराष्ट्र शासनाकडून मीरा वेलणकर दिग्दर्शित बटरफ्लाय या चित्रपटाची निवड करण्यात आली आहे.

**<><><><><><>**

पहिल्या जागतिक मत्स्यव्यवसाय परिषदेला आज गुजरातमधे अहमदाबादच्या सायन्स सिटीत प्रारंभ झाला. केंद्रीय मत्स्यव्यवसाय विकास मंत्री परशोत्तम रुपाला यांच्या हस्ते परिषदेचं उद्घाटन झालं. जागतिक मत्स्यव्यवसाय विकास दिनाचं औचित्य साधून ही पहिली वहिली परिषद आयोजित करण्यात आली आहे. दोन दिवस चालणाऱ्या या परिषदेत देशातून आणि परदेशातून मिळून सुमारे पाच हजार प्रतिनिधी सहभागी होत आहेत.

**<><><><><><>**

इस्राएलने लष्कर ए तय्यबा या संघटनेला दहशतवादी घोषित केलं आहे. २६ नोव्हेंबर २००८ होजी मुंबईवर झालेल्या दहशतवादी हल्ल्याला १५ वर्ष पूर्ण होत असल्यानिमित्त ही घोषणा केल्याचं इस्राएलच्या दूतावासाने प्रसिद्ध केलेल्या पत्रकात म्हटलं आहे.